**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

## FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी  **P.S.(ठाणे):** तडकलास
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0185  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/07/2026 18:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 03/07/2026
**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2026
**Time From (वेळेपासून):** 11:27 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/07/2026  **Time (वेळ):** 18:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/07/2026 18:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 18 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** प प्रादेशीक परीवहन कार्यालय, असोला जि परभणी,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अल्ताफ अयुब मुलाणी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,परभणी,तडकलास,परभणी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ,परभणी,तडकलास,परभणी, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9423586754

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिरा नारायणराव लोकरे | | | 1. यषवंत नगर, परभणी,,परभणी, मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सय्यद जफर सय्यद अकबर | | | 1. मुमताज नगर, धाररोड, परभणी ,परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास**)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (**प्रथम खबर हकीकत **):**

फिर्याद दि. 03/07/2026.

मी अल्ताफ अयुब मुलाणी, वय 39 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. मोनं. 9423586754.

समक्ष पोलीस स्टेशन ताडकळस, जि. परभणी येथे हजर येवून सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी युनीट येथे नोव्हेंबर 2024 पासुन पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे. मुळ तक्रारदार शेख रहीम शेख फहिमुद्दीन, वय 28 वर्ष, व्यवसाय - मजुरी, रा. एक मिनार मस्जीदजवळ, धार रोड, परभणी, ता.,जि. परभणी यांनी दि. 01/07/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, परभणी येथे लेखी तक्रार दिली की, "मी माहे नोव्हेंबर 2025 मध्ये जगन्नाथ भुजंगराव रायमाले, रा. सिरसी बुद्रुक, पोस्ट लोहगाव, ता. जि. परभणी यांचेकडुन होंडा कंपनीची सि.बी. शाईन क्रमांक एम.एच.22 ए.एफ. 6296 मोटार सायकल 23,000 /- रूपयास खरेदी केलेली आहे. सदर मोटार सायकल मी माझे नावावर करणे करीता दि. 20/11/2025 रोजी 408/- रूपयाची फिस परीवहन पोर्टलवर आॅनलाईन भरली होती. परंतु मला माझे घरगुती कामामुळे फिस भरल्याची पावती व मोटार सायकलचे कागदपत्रे उप प्रादेशीक परिवहन कार्यालयात जावुन जमा करता आले नाही. काल दि. 30/06/2026 रोजी मी फिस भरल्याची पावती व मोटार सायकलचे कागदपत्रे घेवुन उप प्रादेशीक परिवहन कार्यालय, असोला येथे गेलो. तेथे कार्यालयातील लिपीक मिरा लोकरे यांना जावुन भेटलो. त्यांना मी भरलेल्या फिस ची पावती व मोटार सायकलचे कागदपत्रे दाखवुन सदर मोटार सायकल माझे नावावर करायची असल्याचे सांगीतले. त्यावेळी लोकरे मॅडम यांनी मला माझेकडील कागदपत्रे जमा करून घेण्यासाठी व सदर मोटार सायकल माझे नावावर करणे कामी पुढील कार्यवाही करण्यासाठी 1,000/- रूपये लागतील असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना आॅनलाईन फिस भरली असल्याचे सांगीतले. परंतु त्यांनी आॅनलाईन फि व्यतिरीक्त 1,000/- रूपये त्यांना द्यावे लागतील असे सांगीतले. तेंव्हा मी त्यांना सदर रक्कमेची पावती मिळेल का? असे विचारले असता त्यांनी पावती मिळणार नसल्याचे सांगीतले. तेंव्हा माझे जवळ पैसे नसल्याने मी तेथुन निघुन आलो.
मी विकत घेतलेली मोटार सायकल माझे नावावर करणेकरीता मी भरलेल्या 408/- रूपये आॅनलाईन फिस व्यतीरीक्त इतर कोणतीही शासकीय फिस लागत नाही. परंतु उप प्रादेशीक परिवहन कार्यालयातील लिपीक मिरा लोकरे या माझेकडील कागदपत्रे जमा करून घेण्यासाठी व सदर मोटार सायकल माझे नावावर करणे कामी पुढील कार्यवाही करण्यासाठी 1,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. परंतु मला त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही. म्हणुन मी तक्रार देत आहे." वगैरे हस्तलिखीत तक्रार तक्रारदार यांनी दिली आहे.

त्यावरून आम्ही तात्काळ दोन शासकीय पंच नामे 1) श्री. रणजीत बळीरामजी गरूड, वय 49 वर्ष, पद - मोजणीदार, जायकवाडी पाटबंधारे उप विभाग क्र. 10, परभणी. 2) श्रीमती ज्योत्सना गणपतराव धाबे, वय 41 वर्ष, पद - कनिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. 02, परभणी यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांची व तक्रारदाराची ओळख करून दिली. तक्रारदाराने पंचाना तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. तसेच तक्रारदाराची हस्तलीखीत तक्रार त्यांना वाचावयास दिली. तक्रारदाराच्या तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांना लिपीक मिरा लोकरे कोठे भेटतील याबाबत विचारपुस केली. तेंव्हा तक्रारदार यांनी लिपीक मिरा लोकरे या उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात भेटतील असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार व दोन्ही पंच

यांना सोबत घेवुन संपुर्ण सापळा पथक असे संपुर्ण किट साहित्यासह शासकीय वाहन क्रमांक एमएच 22 बीसी 2057 ने व मोटार सायकलने रवाना झालो. असोला गावाच्या पलीकडे एका शेतात आडोषाच्या ठिकाणी पोहचुन शासकीय वाहन थांबवण्यात आले.

त्यानंतर शासकीय वाहनात पडताळणी पुर्व कार्यवाही करण्यात आली. सुमारे 13.11 ते 13.33 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार शेख रहीम व पंच क्र. 1 रणजीत गरूड यांना आवश्यक त्या सुचना देवुन व्हाईस रेकाॅर्डरसह लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांना भेटण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, असोला येथे पाठविण्यात आले.

लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, असोला येथे झालेल्या भेटीवेळी तक्रारदार यांनी पंच क्रमांक 01 रणजीत गरूड यांचे समक्ष लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांना " नमस्ते मॅडम... काय म्हणते लोकरे मॅडम...पेपर होता एक... मी गाडी घेतली होती नोंव्हेबर मधी.", "पावती फाडलेली तिची चारशे आठ रुपयाची अं...समोरच लय माझ माग लागलय..नावावर करुन घे म्हणून." असे सांगीतले. तेंव्हा लोकसेविका लिपीक लोकरे यांनी तक्रारदारास "घे न मग" असे सांगीतले. तक्रारदाराचे कामाची कागदपत्रे बघत लिपीक लोकरे यांनी तक्रारदारास " कराव लागन " असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने लोकसेविका लोकरे यांना " बोलान मॅडम.. काय करायच " असे सांगीतले. तेंव्हा लोकसेविका लोकरे यांनी तक्रारदारास "एक देऊन टाक " असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने " तुम्ही बोलान डायरेक्ट काय" असे सांगीतले. तेंव्हा लोकसेविका लोकरे यांनी पुन्हा एकदा "एक देऊन टाक " असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने "एक काय मॅडम ...शंभर रुपये " असे म्हणाले असता लोकसेविका लोकरे यांनी "येडा झाला काय तु " असे सांगीतले. तेंव्हा लोकसेविका लोकरे " पाच पाच दोन... एक " असे म्हणुन एक हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदाराने " पाच पाच दोन...एक...हजार रुपये...हा... मॅडम काय कमी...बोलान हं" असे विचारले असता लोकसेविका लोकरे यांनी "आठशे" असे म्हणाले असता त्यावर तक्रारदाराने " आठशे रुपये.." असे विचारले असता लोकसेविका लोकरे यांनी " हं..." म्हणुन तडजोड अंती आठशे रूपये लाचेची मागणी केली. तक्रारदाराने कागदपत्रामध्ये काही त्रुटी आहेत का असे विचारले असता त्यांनी " खटल्याची घेवुन ये " असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने "जफर साहब...नॉट वान्टेड... हा अस सांगा न तुम्ही डायरेक्ट मॅडम... नॉट वान्टेड घेऊन मॅडम डायरेक्ट इकडच येऊ ना " असे सांगीतले. त्यावर लोकसेविका लोकरे यांनी तक्रारदारास " नॉट वान्टेड घेऊन ये" असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 01 गरूड असे तेथे बाजुच्या खिडकी क्रमांक 11 समोर गेले. तेथे तक्रारदाराने लोकसेवक जफर यांना कागदपत्रे दिली. संगणकावर पडताळणी करून मोटार सायकलवर आर.टी.ओ. कार्यालयामार्फत दंड प्रलंबित नसल्याची खात्री करून लोकसेवक जफर यांनी कागदपत्रावरील एका पानावर शिक्का मारून त्यावर सही केली व कागदपत्रे तक्रारदारास परत दिले. तेंव्हा तक्रारदाराने त्यांना " कित्ते हुए" असे विचारले असता लोकसेवक जफर यांनी पंचासमक्ष " देना.... तुझे क्या देने के.... ला पांच सौ रूपये चल ... दे पांच सौ रूपये दे चल " असे म्हणुन तक्रारदाराकडे पाचशे रूपयाची लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदाराने " ठिक है... ठिक है... देता... हव साहब हव." असे सांगीतले.

लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार शेख रहीम, लोकसेविका लिपीक मिरा लोकरे व लोकसेवक लिपीक जफर यांचे दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरच्या सहाय्याने ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांनी तक्रारदारा कडील मोटार सायकलचे कागदपत्रे जमा करून घेण्यासाठी व सदर मोटार सायकल तक्रारदाराचे नावावर करणे कामी पुढील कार्यवाही करण्यासाठी सुरवातीस 1,000/- रूपये सांगुण तडजोड अंती 800/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांनी तक्रारदारास त्याचे कागदपत्रांवर नो वान्टेड चा शिक्का व सही घेण्याकरीता लोकसेवक लिपीक जफर यांचेकडे पाठवले. लोकसेवक लिपीक जफर यांनी तक्रारदाराने खरेदी केलेल्या मोटार सायकलचा नंबर संगणकावर पडताळुन मोटार सायकलवर आर.टी.ओ. कार्यालयामार्फत दंड प्रलंबित नसल्याची खात्री करून कागदपत्रावर नो वान्टेड लिहीलेला शिक्का मारून त्यावर मोटार सायकलचा नंबर लिहुन त्याखाली सही केली. त्यानंतर तक्रारदारास 500/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लोकसेविका लिपीक मिरा लोकरे आणि लोकसेवक लिपीक जफर यांचेवर सापळा कार्यवाही आजमावण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले.

तक्रारदार शेख रहीम यांनी लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांना देण्यासाठी 800/- रूपये ज्यात 500/- रुपये दराची 01 नोट आणि 100/- रुपये दराच्या 03 नोटा तसेच लोकसेवक लिपीक जफर यांना देण्यासाठी 500/- रूपये ज्यात 500/- रुपये दराची 01 नोट पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत आम्ही सुचना दिल्या. तसेच अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम तक्रारदार शेख रहीम यांच्याकडे देवून व्हाईस रेकाॅर्डरसह तक्रारदार शेख रहीम व पंच क्र.

1 गरूड यांना लोकसेविका लोकरे व लोकसेवक जफर यांची भेट घेण्यासाठी उप प्रादेशीक परीवहन कार्यालय, असोला येथे मोटार सायकलने पाठविले. सुमारे 15.32 ते 15.52 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान झालेल्या भेटीवेळी लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांनी लाचेची रक्कम न स्विकारता तक्रारदारास नंतर येण्यास सांगुण कार्यालयाची खिडकी बंद केली. तसेच तक्रारदार यांची लोकसेवक जफर यांचेशी देखील भेट झाली नाही. त्यामुळे तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगीत करून दि. 03/07/2024 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व व सापळा स्थगीती पंचनामा करण्यात आला आहे.

आज दि. 03/07/2026 रोजी सकाळी तक्रारदार शेख रहीम व दोन्ही पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर आले. तक्रारदार व दोन्ही पंच यांना सोबत घेवुन संपुर्ण सापळा पथक असे संपुर्ण किट साहित्यासह शासकीय वाहन क्रमांक एमएच 22 बीसी 2057 ने व मोटार सायकल ने रवाना झालो. असोला गावाच्या पलीकडे एका शेतात आडोषाचे ठिकाणी पोहचुन शासकीय वाहन थांबवण्यात आले. त्यानंतर शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. दि. 01/07/2026 रोजी तक्रारदार यांनी जमा केलेल्या लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम तक्रारदार शेख रहीम यांच्याकडे देवून व्हाईस रेकॉर्डरसह तक्रारदार शेख रहीम व पंच क्र. 1 गरूड यांना लोकसेविका लोकरे व लोकसेवक जफर यांची भेट घेण्यासाठी उप प्रादेशीक परीवहन कार्यालय, असोला येथे मोटार सायकलने पाठविले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक आवश्यक किट साहित्यासह मोटारसायकलने निघाले.

सुमारे 11.27 ते 11.48 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान झालेल्या भेटीवेळी तक्रारदार शेख रहीम व पंच क्र. 1 गरूड असे असोला गावातील उप प्रादेशीक परीवहन कार्यालय मध्ये गेले. तेथे तक्रारदार शेख रहीम व लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांची पंच क्र. 1 रणजीत गरूड यांच्या समक्ष भेट झाली. भेटी दरम्यान तक्रारदाराने त्याचे कामाचे कागदपत्रे लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांना देवुन त्यांच्याकडे स्वतःचे कामाचा विषय काढला व त्यांना " मॅडम पेपर लय अर्जंट हाय बरका " असे सांगीतले. तेंव्हा लिपीक लोकरे यांनी तक्रारदारास " आता परवाच्या दिवशी तर त... तुला काय मनल, थोडया वेळाने ये " असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने त्यांना " परवाच मनले, इवुच नको मनले जाय मनले... मॅडम कधी होईन पेपर." असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदाराने खिश्यातील 800/- रूपये लाच रक्कम काढुन त्यांना दाखवली असता लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांनी " बघाव लागतय.." असे म्हणुन त्यांचे टेबलचा उजव्या बाजुचा वरचा ड्रॉवर उघडला व इशारा करून तक्रारदारास लाच रक्कम त्यामध्ये टाकण्यास सांगीतली. तेंव्हा तेंव्हा तक्रारदाराने त्याचेकडील अॅन्थ्रासिन पावडर लावलेली 800/- रूपये लाच रक्कम लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांचे सांगणे प्रमाणे त्यांच्या टेबलच्या उजव्या बाजुच्या वरच्या ड्रॉवर मध्ये ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र. 1 गरूड यांच्या सोबत लोकसेवक लिपीक जफर बसत असलेल्या खिडकी समोर गेले. तेथे तक्रारदार शेख रहीम यांनी लोकसेवक लिपीक जफर यांना " ओ जफर सर.........जफर सर " अशी हाक दिली. तेंव्हा यांनी तक्रारदारास "ऐ क्या बोलता " असे सांगीतले. तेंव्हा तक्रारदाराने " कुछ बी नही वोच..... नॉट वान्टेड के" असे म्हणाले. तेंव्हा लोकसेवक लिपीक जफर यांनी " हं.... चल ला.... पेपर हय क्या.." असे सांगीतले. त्यावर तक्रारदाराने "पेपर नयना... पैसे बोले थे ना...." असे म्हणाला. त्यावर लोकसेवक लिपीक जफर यांनी " हं...लाना... फटाक से देना क्या है तो..." असे म्हणुन तक्रारदाराकडुन 500/- रूपये लाच रक्कम स्वतः उजव्या हाताने स्विकारून स्वतःचे पॅन्टीचे मागील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास दिसेल अषा प्रकारे पुर्वनियोजीत इशारा केला. तो इषारा पाहून सापळा पथकातील सर्व स्टाफ उप प्रादेशीक परीवहन कार्यालयातील लोकसेविका लिपीक मिरा लोकरे व लोकसेवक लिपीक जफर यांचे कक्षात जावुन दोघांना ताब्यात घेतले. तसेच लोकसेवक लिपीक जफर यांना लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांचे कक्षामध्ये नेण्यात आले.

तेथे आम्ही स्वतःची ओळख सांगुन लोकसेविका लिपीक मिरा लोकरे व लोकसेवक लिपीक जफर यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अनुक्रमे 01) मिरा नारायणराव लोकरे, वय 37 वर्ष, पद - लिपीक टंकलेखक, उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, असोला, ता.जि. परभणी, सध्या राहणार यषवंत नगर, परभणी, मुळ रा. मौजे सवड, ता.जि. हिंगोली 02) सय्यद जफर सय्यद अकबर, वय 53 वर्ष, पद - लिपीक टंकलेखक, उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, असोला, ता.जि. परभणी, राहणार मुमताज नगर, धाररोड, परभणी असे सांगितले. त्यानंतर लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांना पंचासमक्ष लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ते त्यांच्या टेबलच्या उजव्या बाजुच्या वरच्या ड्रॉवरमध्ये तक्रारदाराचे फाईलच्या आत असल्याचे सांगीतले. त्यावरून पंच क्रमांक 01 गरूड यांनी लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांचे टेबलच्या ड्रॉवर मध्ये असलेली एक फाईल बाहेर काढली. सदर फाईल ही तक्रारदाराची असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सदर फाइलमधील कागदपत्रे तपासली असता त्यामध्ये लाचेची रक्कम मिळुन आल्याने ती त्यांनी बाहेर काढली. सदर 800/- रूपयांच्या नोटांवर

व लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांच्या दोन्ही हातावर पंचासमक्ष अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाष टाकला असता नोटांवर व त्यांच्या उजव्या हातांच्या बोटांवर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तसेच लोकसेवक लिपीक जफर यांना पंचासमक्ष लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ती त्यांच्या पॅन्टीच्या मागील उजव्या बाजुच्या खिश्यात असल्याचे सांगीतले. तेंव्हा आमचे सुचनेवरून पंच क्रमांक 01 गरूड यांनी लोकसेवक जफर यांचे खिश्यातील लाच रक्कम बाहेर काढली. सदर 500/- रूपयाच्या नोटेवर व लोकसेवक जफर यांच्या पॅन्टीचे खिश्यावर व दोन्ही हातावर पंचासमक्ष अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाष टाकला असता नोटावर, पॅन्टीच्या खिश्यात व त्यांच्या उजव्या हातांच्या बोटांवर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर दोन्ही पंचांनी नोटांचे नंबरची पडताळणी केली असता ती लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे. सदरची लाच रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार शेख रहीम, लोकसेविका लिपीक मिरा लोकरे आणि लोकसेवक लिपीक जफर यांचे दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरव्दारे ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे. ध्वनिमुद्रीत संभाषण असलेले मेमरीकार्ड पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे. तसेच लोकसेवक लिपीक जफर यांचे अंगावरील पॅन्ट जप्त करण्यात आली आहे. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे. दि. 01/07/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे तक्रारदार शेख रहीम यांनी दिलेल्या तक्रारीवरून दि. 01/07/2026 रोजी 13.11 ते 13.33 वाजण्याच्या दरम्यान पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी उप प्रादेशीक परीवहन कार्यालय, असोला येथे लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांनी तक्रारदारा कडील मोटार सायकलचे कागदपत्रे जमा करून घेण्यासाठी व सदर मोटार सायकल तक्रारदाराचे नावावर करणे कामी पुढील कार्यवाही करण्यासाठी सुरवातीस 1,000/- रूपये सांगुण तडजोड अंती 800/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच लोकसेवक लिपीक जफर यांनी तक्रारदाराने खरेदी केलेल्या मोटार सायकलचा नंबर संगणकावर पडताळुन मोटार सायकलवर आर.टी.ओ. कार्यालयामार्फत दंड प्रलंबित नसल्याची खात्री करून कागदपत्रावर नो वान्टेड लिहीलेला शिक्का मारून त्यावर मोटार सायकलचा नंबर लिहुन त्याखाली सही करून केलेल्या कामाकरीता तक्रारदारास 500/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दि. 03/07/2026 रोजी 11.27 ते 11.48 वाजण्याच्या दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान उप प्रादेशीक परीवहन कार्यालय, असोला येथे लोकसेविका लिपीक मिरा लोकरे यांनी तक्रारदाराकडुन पंचासमक्ष 800/- रूपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे. तसेच लोकसेवक जफर यांनी तक्रारदाराकडुन पंचासमक्ष 500/- रूपये लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणून माझी 01) मिरा नारायणराव लोकरे, वय 37 वर्ष, पद - लिपीक टंकलेखक, उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, असोला, ता.जि. परभणी, सध्या राहणार यषवंत नगर, परभणी, मुळ रा. मौजे सवड, ता.जि. हिंगोली 02) सय्यद जफर सय्यद अकबर, वय 53 वर्ष, पद - लिपीक टंकलेखक, उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, असोला, ता.जि. परभणी, राहणार मुमताज नगर, धाररोड, परभणी यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** **(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

SHIRDHAR BHAGWATRAO JAGTAP(I (Inspector)) / DGPSBIM8519 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**Registered by (**नोंदणी अधिकारी**)**

**Signature of Officer-in-charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** SHIRDHAR BHAGWA
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** DGPSBJM8519

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**